# फायनान्स अ‍ॅण्ड अकाउंट्स एम्प्लॉईज युनियन

*प्लॉट नं. १२, रवी नगर, धुळे रोड, अमळनेर, जळगाव ४२५ ४०१*
*(रजि.नं. एनएसके/जे/२३८२)*

| विशाल लोहार | विजय जाधव | प्रितम घोगरे |
|---|---|---|
| अध्यक्ष | महासचिव | उपाध्यक्ष |
| ९६६५२०२७३६ | ९३०९८१७९८३ | ९३७०९३१५९२ |

संदीप तिकटे
*कोषाध्यक्ष*
९७६६२०९६७८

प्रशांत नरड
*प्रसिद्धी प्रमुख*
९१४६६८६२२०

लक्ष्मीकांत पवार
*सहसचिव*
९६६५३०५५७७

विलास लकडे
*सहसचिव*
९६३७४१५४४५

परेश कलंत्री
*संघटक*
९६६५०९२२६८

स्नेहल वैष्णव
*महिला प्रतिनिधी*
९६३७४१५४४५

जा.क्र.FAEU/मुख्य.का./ 0013 दिनांक: 07/10/2025

**प्रति,**
**मा. संचालक (मा.सं.),**
**महावितरण मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई.**

**विषय : दिनांक २२/०९/२०२५ रोजीच्या Draft MPR मध्ये मांडलेल्या पुनर्रचनेतील अडचणी व सुधारणा सादर करणेबाबत..**

**संदर्भ :** 1. दि. २५ मार्च २०२५ रोजी पुनर्रचना समिती व मुख्यालय प्रशासनास सादर केलेले १३१४ लेखा कर्मचारी यांच्या स्वाक्षरीसह सुधारणात्मक निवेदन.
2. दि. १० सप्टेंबर २०२५ रोजी मा. मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांना पाठविलेले विचारणा पत्र.
3. दि. १२ सप्टेंबर २०२५ रोजी मुख्यालयास मेलद्वारे मागितलेली माहिती.
4. दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी व्यवस्थापन संचालकांना सादर केलेले आक्षेप व सुधारणा संदर्भातील पत्र (जा.क्र.FAEU/मुख्य.का./0010).
5. दि. २४ सप्टेंबर २०२५ रोजी मा. मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री यांना सादर केलेले निवेदन. (जा.क्र.FAEU/मुख्य.का./0012)
6. दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी मा. संचालक (मांस) व संघटनेसोबत पार पडलेली बैठक.

महोदय,

आम्ही संघटना व लेखा अभ्यास गट म्हणून पुनर्रचना प्रक्रियेच्या सुरुवातीपासूनच वास्तव परिस्थिती मांडून योग्य सुधारणा सुचवित आलो आहोत. वेळोवेळी पत्रव्यवहार, निवेदनं आणि तथ्याधारित प्रस्ताव सादर करून अनेक महत्त्वाचे मुद्दे निदर्शनास आणले. संदर्भ क्रमांक ६ अन्वये आपणा सोबत पार पडलेल्या बैठकीत आपल्या निदर्शनास आणून दिले प्रमाणे **"पुनर्रचनेतून बिलिंग कर्मचारी यांचे कामातून कर्मचारी कमी करून केलेली आणि कार्यरत पदात प्रत्यक्ष असे दुहेरी कपात होणार आहे, त्याचा ग्राहक सेवेवर थेट नकारात्मक परिणाम होणार"**. विशेषतः सध्या सुरु असलेल्या **AMISP स्मार्ट मीटरिंग प्रक्रियेमुळे निर्माण झालेला गोंधळ, प्रचंड ग्राहक तक्रारी आणि दैनंदिन अतिरिक्त कामाचा भार** यामुळे कर्मचारी पूर्णपणे त्रस्त आहेत. अशा परिस्थितीत पुनर्रचना आणखी अव्यवहार्य ठरत असून, आपण बैठकीत निर्देशित केले प्रमाणे अडचणी व अपेक्षित सुधारणा आपणाकडे प्रस्तावित करीत आहोत.

1. महावितरण कंपनीच्या विद्यमान संरचनेत कार्यरत **६५४ उपविभागांमध्ये (३५ लहान + ६१९ नियमित)** Norms नुसार एकूण **३७४९ लेखा कर्मचारी** असणे अपेक्षित आहे. परंतु प्रत्यक्षात फक्त **२७०३ कर्मचारी कार्यरत** असून तब्बल **१०४६ पदे रिक्त** आहेत — म्हणजेच सध्याही सुमारे **२८% मनुष्यबळाची टंचाई** आहे. या कमतरतेमुळे उपविभागीय लेखा कर्मचारी यांना **उशिरापर्यंत व सुट्टीच्या दिवशीही काम करावे लागते**, जे अन्यायकारक आहे. पुनर्रचना मांडताना या ठिकाणी **रिक्त पदांची पूर्तता करून कार्यभाराचे योग्य विभाजन** होणे अपेक्षित होते; परंतु प्रत्यक्षात **रिक्त पदे कायम ठेवूनच पुनर्रचनेची मांडणी** करण्यात आली आहे, जी अव्यवहार्य असून कंपनी, कर्मचारी व पर्यायाने ग्राहक यांच्या दिर्घकालीन हितास बाधा पोहोचवनारी ठरते.

   <u>**प्रस्तावित उपाय**</u>

   सदर परिस्थितीत **१००% रिक्त पदांची तातडीने भरती** करून सुधारित कार्यभाराचा अभ्यास पूर्ण झाल्यानंतरच

# फायनान्स ॲण्ड अकाउंट्स एम्प्लॉईज युनियन

*प्लॉट नं. १२, रवी नगर, धुळे रोड, अमळनेर, जळगाव ४२५ ४०१*
*(रजि.नं. एनएसके/जे/२३८२)*

विशाल लोहार
अध्यक्ष
९६६५२०२७३६

विजय जाधव
महासचिव
९३०९८१७९८३

प्रितम घोगरे
उपाध्यक्ष
९३७०९३१५९२

संदीप तिकटे
*कोषाध्यक्ष*
९७६६२०९६७८

प्रशांत नरड
*प्रसिद्धी प्रमुख*
९१४६६८६२२०

लक्ष्मीकांत पवार
*सहसचिव*
९६६५३०५५७७

विलास लकडे
*सहसचिव*
९६३७४१५४४५

परेश कलंत्री
*संघटक*
९६६५०९२२६८

स्नेहल वैष्णव
*महिला प्रतिनिधी*
९६३७४१५४४५


पुनर्रचना राबवावी. सध्या प्रस्तावित पुनर्रचनेत उपविभागीय बिलिंग पदांमध्ये ३०% कायमची कपात करण्यात आली आहे, ज्यामुळे ग्राहक सेवा आणि महसूल व्यवस्थापनावर गंभीर नकारात्मक परिणाम होईल. त्यामुळे **सर्व रिक्त पदे तातडीने भरून अनुशेष दूर करावा**, ही संघटनेची ठाम मागणी आहे.

2. सध्या १४९ शहरी उपविभागांमध्ये १.०८ कोटी ग्राहकांचे बिलिंग ८९४ (९००) **लेखा कर्मचारी** करतात. प्रस्तावित पुनर्रचनेत हेच काम फक्त **५९२ (६००) कर्मचारी** यांच्यावर टाकून तब्बल **३०२ पदे बिलिंग कामांतून कमी** करण्यात आली आहेत. यात कपातीमुळे उरलेल्या कर्मचाऱ्यांचा कामाचा ताण प्रचंड वाढून ग्राहक सेवेवर थेट नकारात्मक परिणाम होणार आहे.

   **<u>प्रस्तावित उपाय</u>**

   नवीन संरचनेचा व कर्तव्य तक्त्याचा (Job Chart) अभ्यास केला असता दिसते की LDC Recovery–2, UDC NSC–1 (B&R) **आणि** UDC Store–1 (O&M) या पदांची पुनर्स्थापना करून त्यांना अशा कामांत गुंतविण्यात आले आहे ज्यामध्ये मुख्यतः **२–३ डेटा एंट्री प्रकारची कामे** असतात. हीच कामे यापूर्वी प्रती कक्ष **कार्यालयीन सहाय्यकांमार्फत** कुशलतेने पार पाडली जात होती. प्रत्यक्षात हे ४ **लेखा कर्मचारी बिलिंग विभागात २०–२२ प्रकारची महत्त्वाची कामे पार पाडतात, संबंधित ग्राहक तक्रारी हाताळतात आणि त्यांना या क्षेत्रातील अनुभव व कौशल्य आहे**.या अनुभवी बिलिंग कर्मचाऱ्यांची अशा नवीन विंगमध्ये पुनर्स्थापना केल्याने त्यांच्या संचित कौशल्याचा अपव्यय होईल तसेच बिलिंग विभागाची कार्यक्षमता घटेल. त्यामुळे अशा पदांवर **३१७ कार्यालयीन सहाय्यक कर्मचारी यांची पदस्थापना करणे अपेक्षित आहे,** लेखा व बिलिंग कर्मचाऱ्यांनी त्यांच्या मूळ कौशल्याशी सुसंगत कामेच सुरू ठेवावीत व त्यांना नवीन **B&R उपविभागातील बिलिंग विभागात आस्थापित ठेवावे.**

3. MPR नुसार १४९ शहरी उपविभागांमधील तब्बल **६११ शाखा कार्यालये (सेक्शन) B&R सेवेतून रद्द** करण्यात आली आहेत. त्यामुळे रोजचा **६११ ठिकाणी होणारा ग्राहक संवाद आता एका B&R उपविभागाकडे केंद्रीत** होणार आहे. शहरी भागात ग्राहक प्रत्यक्ष येऊन तक्रारी मांडतात, अलीकडील काळात हे प्रमाण प्रचंड वाढले आहे. सदर ग्राहक संपर्कात लेखा कर्मचारी यांचा मोठा वेळ खर्च होतो व कार्यक्षमता सुद्धा मंदावते. आम्ही याबाबत वेळोवेळी पत्रव्यवहार करून सुधारणा प्रस्तावित करणेबाबत मागणी केली, मात्र पुनर्रचनेत ग्राहक संपर्क व खर्च होणारा वेळ यावर विचारच केलेला नाही. परिणामी, **तक्रारी दुप्पट, ताण प्रचंड आणि सेवेत गोंधळ** होणार हे स्पष्ट आहे. कंपनीचे ध्येय 'ग्राहक सेवा' केंद्रस्थानी असतानाही ६११ शाखा बंद करणे ही गंभीर विसंगती ठरते.

   **प्रस्तावित उपाय**

   ग्राहक संवाद हाताळणे साठी नवीन तयार B&R उपविभाग समर्पित ग्राहक संवाद केंद्र Consumer Facility Center निर्मित करावे, जेथे ग्राहकांना सर्व प्रकारच्या संवाद सुविधा देता येतील आणि सर्व विभाग कर्मचारी विनाव्यत्यय पूर्ण क्षमतेनिशी कार्यरत राहतील. असे ७४ ग्राहक संवाद केंद्र निर्मित केले जावेत. वरील सु.क्र.१ प्रमाणे येथे प्रती नवनिर्मित ग्राहक सुविधा केंद्रात ३ कार्यालयीन सहाय्यक यांची पदस्थापना करावी यातून कंपनी मनुष्य बळाचा योग्य करणे शक्य होईल.

4. पुनर्रचनेत मांडलेप्रमाणे प्रति विभागातील **निम्नस्तर लिपिक लेखा** (LDC – **१३४ पदे)** तसेच मंडळ कार्यालयातील पूर्वीच्या रचनेत २५० एच.टी. ग्राहकांमागे १ सहाय्यक लेखापाल हे पद मंजूर होते. परंतु पुनर्रचनेत ५०० ग्राहकांमागे

एक सहाय्यक लेखापाल पद मंजूर आहे. **५०% HT बिलिंग सहाय्यक लेखापाल (अंदाजे ४१ पदे)** यांची मंजूर पदे कपात करण्यात आले आहेत. सदर बदलामुळे महसूल नुकसान, न्यायालयीन आदेश विलंब, चुकीच्या बिलिंग दुरुस्त्या व ग्राहक तक्रारींचे निवारण यामुळे होणारे आर्थिक व प्रतिष्ठात्मक नुकसान मनुष्यबळ खर्च बचतीपेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे. वेळखाऊ व उच्च-जोखमीची कामे वेळेत व अचूक पार पाडण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ आवश्यक आहे.

**<u>प्रस्तावित उपाय</u>**

सदर विभाग व मंडळ कार्यालय येथील कार्यपद्धतीत कोणताच बदल करणेत आला नसले मुळे तेथे कार्यरत मनुष्यबळ कमी करणे म्हणजे तेथील समकक्ष कर्मचारी यांच्यावर अतिरिक्त कामाचा बोझा टाकला जाणार आहे, सोबतच **सदर पदांचे बदली धोरण व पदोन्नती श्रेणी विस्कटणार आहे.** म्हणून **निम्नस्तर लिपिक लेखा (विभाग कार्यालय) , HT बिलिंग सहाय्यक लेखापाल (मंडळ कार्यालय) ची प्रस्तावित** पद कपात रद्द करावी.

5. प्रस्तावित **Variable Norms म्हणजे भविष्यातील उपविभागीय लेखा कर्मचारी यांची मोठी कपात.**

   **Variable Norms प्रमाणे** Urban उपविभागासाठी प्रत्येकी ६०,००० ग्राहकांमागे फक्त १ LDC (जास्तीत जास्त २), Corporation उपविभागासाठी ८०,००० ग्राहकांमागे १ LDC (जास्तीत जास्त २), Metro उपविभागासाठी १,००,००० ग्राहकांमागे १ LDC (जास्तीत जास्त २) अशी तरतूद आहे. पूर्वी दर १०,००० अतिरिक्त ग्राहकांमागे १ LDC वाढणार असे असताना आता तीच पदसंख्या ६०,००० ते १,००,००० ग्राहकांवर मर्यादित केली गेली आहे. **म्हणजेच भविष्यात ग्राहकसंख्या वाढली तरी लेखा कर्मचाऱ्यांची संख्या वाढणार नाही, उलट त्यांच्या कामाचा ताण अनेक पटीने वाढणार आहे.** त्यामुळे ही पुनर्रचना कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेला बाधा आणणारी व ग्राहक सेवेवर प्रतिकूल परिणाम करणारी ठरेल.

   **<u>प्रस्तावित उपाय</u>**

   सदर Variable Norms **हे वास्तव क्षेत्रीय परिस्थितीशी विसंगत असून, त्यांचे पुनर्विलोकन व्हावे. त्यासाठी प्रत्यक्ष कार्यभार अभ्यासाला जावा.**

6. दि.०५ सप्टेंबर २०२४ रोजी क्षेत्रीय संचालक, छत्रपती संभाजीनगर क्षेत्रीय कार्यालय यांचे परिपत्रक क्र. १५७८ नुसार अपवादात्मक वाचन (Exceptional Reading) तसेच २% तपासणी वाचन (Check Reading) करण्याची जबाबदारी स्पष्टपणे **कक्ष कार्यालयातील कर्मचारी यांचेवर वर टाकलेली आहे ज्यांची संख्या पर्यायाने जास्त होती.** परंतु MPR मधून कोणतेही कारण न देता हेच काम **उपविभागातील बिलिंग LDC पदांना सोपवण्यात आले आहे.**

   **<u>प्रस्तावित उपाय</u>**

   सदर कामाचे स्वरूप पाहता, ग्राहकाकडे जाऊन मिटर वाचन घेणे अपेक्षित आहे. कार्यालयात त्यापेक्षा जास्त महत्वाची कामे प्रलंबित ठेवून कर्मचारी यांना मिटर वाचन घेनेस आदेशित करणे. हे कंपनी हितास बाधा पोहोचविणारे आहे. तरी वरील कामांचे कंपनीस उपयोगिता मूल्य अभ्यासून, लेखा कर्मचारी यांच्या कर्तव्य तक्त्यातून वगळावे.

7. MPR-29/2010 नुसार सध्या महावितरणमध्ये **३५ लहान उपविभाग** (Small Subdivisions) कार्यरत आहेत. Norms प्रमाणे प्रत्येक ठिकाणी बिलिंगसाठी फक्त **१ UDC** (A/c) पद मंजूर आहे. परंतु प्रत्यक्ष परिस्थितीत या उपविभागांमध्ये ग्राहकसंख्या **२० ते २५ हजारांपर्यंत पोहोचली आहे** तसेच महसूल मागणी रक्कमही **१०० ते २५०**

FINANCE & ACCOUNTS EMPLOYEES' UNION 2025

# फायनान्स ॲण्ड अकाउंट्स एम्प्लॉईज युनियन

*प्लॉट नं. १२, रवी नगर, धुळे रोड, अमळनेर, जळगाव ४२५ ४०१*
*(रजि.नं. एनएसके/जे/२३८२)*

विशाल लोहार
अध्यक्ष
९६६५२०२७३६

विजय जाधव
महासचिव
९३०९८१७९८३

प्रितम घोगरे
उपाध्यक्ष
९३७०९३१५९२

संदीप तिकटे
*कोषाध्यक्ष*
९७६६२०९६७८

प्रशांत नरड
*प्रसिद्धी प्रमुख*
९१४६६८६२२०

लक्ष्मीकांत पवार
*सहसचिव*
९६६५३०५५७७

विलास लकडे
*सहसचिव*
९६३७४१५४४५

परेश कलंत्री
*संघटक*
९६६५०९२२६८

स्नेहल वैष्णव
*महिला प्रतिनिधी*
९६३७४१५४४५

**लाखांपर्यंत** आहे. बदललेल्या कार्यपद्धतीनुसार बिलिंग विभागात एकाच वेळी अनेक कामे हाताळणे अपेक्षित असताना, केवळ एकच कर्मचारी नियुक्त असल्यामुळे या कर्मचाऱ्यांवर असह्य कामाचा ताण टाकला जातो.

**प्रस्तावित उपाय**

इतक्या मोठ्या ग्राहकसंख्या आणि महसूल जबाबदाऱ्या असलेल्या मात्र लहान उपविभाग दर्जा असणाऱ्या उपविभाग यांना **पुनर्रचनेत विशेष दखल घेवून नियमित उपविभाग दर्जा देनेत यावा व नियमित ६ लेखा पदे १ सहाय्यक लेखापाल, २ उच्चस्तर लिपिक व ३ निम्नस्तर लिपिक इतकी पदे मंजूर करावीत.**

8. **पुनर्रचित स्थळ तपासणी पद्धत कंपनीच्या महसुलास जोखीम.**
   आजपर्यंत महावितरणमधील अनेक महत्त्वाच्या कामांमध्ये स्थळ परीक्षण अहवाल (Spot Verification Report) अधिकृत करण्याची जबाबदारी शाखा प्रमुख अभियंत्यांकडे होती. मात्र पुनर्रचनेनुसार ही जबाबदारी फक्त तांत्रिक कर्मचाऱ्यांवर टाकण्यात आली असून अभियंते पूर्णपणे मुक्त करण्यात आले आहेत. हा बदल केवळ अव्यवहार्यच नाही, तर कंपनीच्या महसुलालाच थेट धोक्यात आणणारा आहे.

   **प्रस्तावित उपाय**

   स्थळ परीक्षण करताना ग्राहकाचा मंजूर भार, प्रत्यक्ष वापर, मीटरची स्थिती, बिल तपासणी, अनधिकृत वापराची शंका इ. अनेक महत्वाची निरीक्षणे अभियंते नोंदवतात आणि त्यावरून महसुली सुरक्षितता सुनिश्चित होते. परंतु अभियंत्यांचा अधिकृत सहभाग व देखरेख पूर्णपणे काढून टाकल्यास अहवालांची **अचूकता, जबाबदारी आणि उत्तरदायित्व गंभीरपणे धोक्यात येईल.** महसूल सुरक्षेसाठी अत्यावश्यक असलेली अभियंता-स्तरावरील पडताळणी बाजूला न सारता बिलिंग विभागात एक **सहाय्यक अभियंता यांची स्थळ परीक्षण कामी नियुक्ती व्हावी.**

9. सध्याच्या पुनर्रचनेत उपविभागीय कार्यालयांतील Cash Collection Center (विजबिल भरणा केंद्र) चालवण्यासाठी स्वतंत्र मनुष्यबळाची तरतूद नाही. मात्र बऱ्याच उपविभागात आहे त्या मनुष्यबळावर सदर भरणा केंद्र चालवले जात आहेत. सध्या बिलिंग टीममधील दोन लेखा कर्मचाऱ्याला हे काम तात्पुरते दिले जाते, ज्यामुळे सदर कर्मचारी करीत असलेले काम इतर कर्मचारी यांचेवर अतिरिक्त लादले जाते, त्याचा मूळ बिलिंग कार्यावर थेट परिणाम होतो आणि महसूल प्रक्रियेत विलंब होतो.

   **प्रस्तावित उपाय**

   प्रशासनाला जर असे भरणा केंद्र यापुढे कार्यान्वित ठेवायचे असतील तर अश्या प्रत्येक उपविभागात Cash Collection Center साठी १. Cashier.२. Cash Assistant करावी. हे पद बिलिंग टीमपासून स्वतंत्र ठेवून, केवळ महसूल स्वीकारणी व कॅश बुक नोंदीसाठी जबाबदार असावे.यामुळे महसूल वसुलीची पारदर्शकता वाढेल, लेखा कर्मचाऱ्यांचा ताण कमी होईल, आणि कार्यक्षमता टिकून राहील.

10. मुख्य कार्यालयाद्वारे वेळोवेळी सादर करण्यात आलेल्या पुनर्रचनेवरील जॉब चार्ट यांचा अभ्यास केला असता, असे जाणवते की पुनर्रचना समितीने प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या कार्यालये व कर्मचारी यांच्या कामांचा सखोल अभ्यास केलेला नाही. आपल्या द्वारे सादर करण्यात आलेल्या जॉब चार्टमध्ये नमूद केलेली कामे व कर्मचारी प्रत्यक्षात पार पाडत असलेल्या कामांमध्ये लक्षणीय तफावत आहे.

**प्रस्तावित उपाय**

सर्व कर्मचारी काम करत असलेल्या कामांचे मुख्य कार्यालयाकडून मूल्यमापन करण्यात यावे. व Technical-Non Technical, Field – Non Field या तत्वावर कामांची विभागणी करून लेखा विभागातील मनुष्यबळ कायम ठेवावे. तसेच कर्मचाऱ्यांच्या **वर्क नॉर्म्स सोबतच वर्क फ्लो (एखादे काम हे कोणत्या stage ला कोणत्या कर्मचारी यांनी करावे हे निश्चित करणे)** निश्चित करण्यात यावा.

11. जॉब चार्टमधील "Any other work assigned by higher/superior authority" ही शब्दरचना अतिशय अस्पष्ट व व्यापक असून, तिचा वापर करून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून लेखा संवर्गावर नियमबाह्य व असंबंधित कामे लादली जाण्याची शक्यता आहे.

    **प्रस्तावित उपाय**

    कामाची व्याप्ती संबंधित पदापुरतीच मर्यादित ठेवण्यासाठी खालीलप्रमाणे शब्दरचना वापरावी —

    "Any other work related to **Your duties**, as assigned by higher authority."

12. MPR मधील CE, SE व EE यांना मनुष्यबळ पुनर्वाटपाचे अधिकार दिले असले तरी काही ठिकाणी या तरतुदीचा मनमानी वापर होत असून "कॉमन पूल",सारखे आदेश काढले जात आहेत त्यातून कायमचा अतिरिक्त कार्यभार आदेशित केला जात आहे, अशा आदेशांमुळे पुनर्रचनेतील समतोल व एकसमानता बिघडली आहे. परिणामी, प्रत्येक झोनमध्ये भिन्न तत्त्व लागू होत असून पुनर्रचनेचा उद्देशच हरवला आहे.

    **प्रस्तावित उपाय**

    मनुष्यबळ पुनर्वाटपासाठी एकसमान मुख्यालयीन मार्गदर्शक तत्त्वे (Uniform HR Policy) तयार करावी , कोणत्याही स्थानिक बदलापूर्वी मुख्यालयाची पूर्वमंजुरी बंधनकारक करावी.कॉमन पूल सारखे आदेश तत्काळ पुनर्विलोकन करून रद्दबातल करावेत.

13. नवीन जॉब चार्ट नुसार मंडळ कार्यालयात लेखा विभागात revenue section मध्ये एकही LDC देण्यात आलेला नाही त्यामुळे त्याचा कामाचा ताण UDC वर येऊ शकतो..

    **प्रस्तावित उपाय**

    Audit section मधून एक LDC revenue section मध्ये देण्यात यावा. जेणे करून revenue section ची जबाबदार आणि महत्वाची कामे योग्य पद्धतीने केली जातील.

वरील सर्व सुधारणा मुद्दे हे संघटनेने मांडलेल्या वास्तव परिस्थिती, कार्यक्षमता आणि ग्राहक हिताच्या दृष्टीने अत्यावश्यक बदल आहेत. या सुधारणा केवळ कर्मचारी हितासाठी नव्हेत, तर **कंपनीच्या महसूल स्थैर्य, सेवा गुणवत्ते आणि प्रशासनिक सुसूत्रता** यासाठीही आवश्यक आहेत.प्रशासनाने जाहीर केलेली पुनर्रचनेची उद्दिष्टे कार्यक्षमता वाढवणे, ग्राहक सेवा वेळेत उपलब्ध करून देणे, उत्तरदायित्व मजबूत करणे व संसाधनांचा सर्वोत्तम वापर करणे ही निश्चितच स्वागतार्ह आहेत. मात्र प्रत्यक्ष मांडलेल्या पुनर्रचनेत झालेल्या **मनुष्यबळ कपाती, कार्यरत कर्मचाऱ्यांवरील असमान कामवाटप, शाखा कार्यालये बंद करणे, अभियंता-स्तरीय पडताळणी काढून टाकणे आणि अनुभवी बिलिंग कर्मचाऱ्यांचे चुकीचे पुनर्वसन** या बाबी या उद्दिष्टांच्या पूर्णपणे विरोधात आहेत.

# फायनान्स ॲण्ड अकाउंट्स एम्प्लॉईज युनियन

*प्लॉट नं. १२, रवी नगर, धुळे रोड, अमळनेर, जळगाव ४२५ ४०१*
*(रजि.नं. एनएसके/जे/२३८२)*

| विशाल लोहार | विजय जाधव | प्रितम घोगरे |
|---|---|---|
| अध्यक्ष | महासचिव | उपाध्यक्ष |
| ९६६५२०२७३६ | ९३०९८१७९८३ | ९३७०९३१५९२ |

संदीप तिकटे
*कोषाध्यक्ष*
९७६६२०९६७८

प्रशांत नरड
*प्रसिद्धी प्रमुख*
९१४६६८६२२०

लक्ष्मीकांत पवार
*सहसचिव*
९६६५३०५५७७

विलास लकडे
*सहसचिव*
९६३७४१५४४५

परेश कलंत्री
*संघटक*
९६६५०९२२६८

स्नेहल वैष्णव
*महिला प्रतिनिधी*
९६३७४१५४४५


संघटनेचे ठाम मत आहे की सध्याच्या पुनर्रचनेचा **मूलभूत पाया (Base)** अत्यंत कमकुवत असून, ही रचना प्रत्यक्ष क्षेत्रीय कार्यसंस्कृती व कामाच्या वास्तवाशी विसंगत आहे. त्यामुळे या पुनर्रचनेचे **संपूर्ण पुनर्मूल्यांकन** करून एक **नवीन पुनर्रचना समिती (Reorganised Committee)** स्थापन करणे आवश्यक आहे, ज्यामध्ये **क्षेत्रीय अनुभवी अधिकारी व प्रत्येक संवर्गातील तज्ञ कर्मचारी** यांचा सहभाग असेल.ही समिती प्रत्येक कर्मचाऱ्याच्या **प्रत्यक्ष कामाचा ताण, आवश्यकतेचा अभ्यास**, तसेच कंपनीतील **अनावश्यक प्रक्रिया व कामांचे पुनर्मूल्यांकन** करून त्यांचे तात्काळ निरसन करेल. अशा प्रकारे नव्याने तयार होणारी पुनर्रचना ही केवळ कंपनीसाठीच नव्हे, तर **कर्मचारी, ग्राहक आणि सर्व संबंधित भागधारकांसाठी हितकारक** ठरेल, हीच आमची अपेक्षा आहे.

अध्यक्ष
**विशाल लोहार**

महासचिव
**विजय जाधव**

**प्रत सविनय सादर.**

1.मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महावितरण मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई.
2. मा. संचालक (संचलन), महावितरण मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई.
3. मा. संचालक (वित्त), महावितरण मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई
4. मा. अध्यक्ष, पुनर्रचना समिती, महावितरण मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई.
5. मा. संचालक (मा.सं.), महावितरण मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई.
6. मा. मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई.